# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०१/२०१८

## १) मुलीचा वियभंग करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०५/०१/२०१८ चे १४.०० ते १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही जात असतांनी यातील आरोपीने वियभंग करण्याच्या उद्देशाने फौजदारी पात्र बलप्रयोग केला, व छेडछाड केली व पाठलाग करून अश्लिल शिवीगाळ करून धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३५४(अ)(ड)२९४,,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुळे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

## २) महिलेला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०५/०१/२०१८ चे १७.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे घरी किचन रूमचे दारात ऊभी राहुन लसुन साफ करीत असता, यातील आरोपीने फिर्यादीस पाहुण अश्लिल शब्दात शिवीगाळ करून लज्जीत केले व जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ५०९,२९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

## ३) अज्ञात ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक गंभिर जखमी:–

दिनांक २३/१२/२०१७ चे ०.५०० वाजता. दरम्यान यातील मृतक नंदकुमार शेंदरे वय १८ वर्षरा. पलाडी हा ट्रक क्र. एमएच ३६/एफ ३० ५० या ट्रकवर चालक शामचरण शालीकराम पंधरे रा.रावणवाडी यांचे सोबत बसुन भंडारा कडुन अडयाळ करीता जात असतांनी अडयाळ कडुन येणा–या यातील अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकचे ट्रकला धडक मारून मृतक व चालक शामरचण यांना गंभिर जखमी करून ट्रक घेवुन पळुन गेल्याने मृतक यास उपचाराकरीता मेडीक कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जफौ. चे कागदपत्रावरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,,३३८,३०४(अ) भादवी. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

## ४) ट्रकची ईनोव्हा गाडीला धडक लागुन नुकसानी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०६/०१/२०१८ चे १४.५१ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी अशोदास खिलावनदास मानिकपुरी वय ४० वर्ष रा. महासमुन तुमा डवटी जि. महासमुन छ.ग.हा त्याची इनोव्हा गाडी क्र. सीजी ०४ केयु ४२०० ने एनएच ०६ रोडने जात असता मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे गाडी ला धडक मारून अंदाजे २०,००० /रु. ची नुकसान करून पळुन गेल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादवी. सहकलम १३४,१८७,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) अश्लिल छायाचित्र व अश्लिल मॅसेज व अश्लिल पत्रके छापुन अभृ नुकसान करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/१२/२०१७ ते ०६/१२/२०१८ पर्यंत मोबाईल कमांकावर व्हॉटस्अप कमांकावर अज्ञात आरोपीने फिर्यादीचे पत्नीचे व फिर्यादीचे मोबाईलवर अश्लिल मॅसेज टाकुन व्हॉट्स्अप ग्रुप तयार करून त्यावर अश्लिल छायाचित्र व अश्लिल मॅसेज टाकले तसेच पत्नीचे नावे अज्ञात ईसमाने अश्लिल पत्रके छापले व फिर्यादीचे घरा समोर टांगले व अभृ नुकसान करून धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ६७(ब)आयटी अॅक्ट सहकलम ५०१,५०६,५०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पुसाटे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**(अ)** दिनांक ०६/०१/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स जिप गाडी ही बावणकर चौक तुमसर येथे सार्वजनिक ठिकाणी डांबरी रोडवर मधोमध उभी करून येणाऱ्या जाणाऱ्या लोंकांना अडथडा निर्माण होईल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने, सर तर्फे फिर्यादी पोका. धावडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कंळबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत

**(ब)** दिनांक ०६/०१/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स जिप गाडी ही बावणकर चौक तुमसर येथे सार्वजनिक ठिकाणी डांबरी रोडवर मधोमध उभी करून येणाऱ्या जाणाऱ्या लोंकांना अडथडा निर्माण होईल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने, सर तर्फे फिर्यादी पोका. धावडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कंळबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत

**७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०६/०१/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ट्रॅक्टर हा भिलेवाडा शिवार एनएच ०६ रोड ते खडकी जाणारा डांबरी रोड येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. सेलोकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत

**८) विषारी औषध प्राशन करून औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०६/०१/२०१८ चे १४.२० वाजता दरम्यान यातील मृतक मंगल बिसन कुथे वय वय ६० वर्ष, रा. सरांडी बुज याने विषरी औषध प्राषण केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन व फिर्यादी पो.ना. गोंधुळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. नेवारे पो.स्टे लाखांदर हे करीत आहेत.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०६/१२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – १२ तीन सिटर वाहनांवरती– १५ केसेस व ईतर वाहनांवरती –७५ केसेस करण्यात आले आहे.

(एच.एम. रायपुरे)
स.पो.नि. (नियत्रंण कक्ष अधीकारी)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.